**आदिवासी उप योजना क्षेत्रातील पिण्याचा पाणी पुरवठा कार्यक्रम राबविणे.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**निर्णय क्र.ग्रापापु-१०९८/प्र.क्र.२१२/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- ३० ऑक्टोबर, १९९८**

**संदर्भ :-**

१. शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र.व्हीडब्ल्यूएस ३८७३/७०१०/एफ-३, दिनांक २८ मार्च, १९७३
२. शासन निर्णय ग्राम विकास विभाग क्र.ग्रापापु-१०९१/सीआर-२०७/३९-अ, दिनांक १८ जून, १९९१
३. शासन निर्णय ग्राम विकास विभाग व जल संधारण विभाग क्र.एफआरजी-१०९३/सीआर-२४२६/२४, दिनांक १२ नोव्हेंबर, १९९३
४. शासन निर्णय ग्राम विकास व जल संधारण विभाग क्र.ग्रापापु-१०९३/सीआर-७४४/३९-अ, दिनांक १० जानेवारी, १९९४
५. शासन निर्णय ग्राम विकास व जल संधारण विभाग क्र.ग्रापापु-१०९४/सीआर-८९६/३९-अ, दिनांक १४ जून, १९९४
६. शासन पत्र ग्राम विकास व जल संधारण विभाग क्र.ग्रापापु-१०९४/सीआर-/३९-अ, दिनांक १४ जुलै, १९९४
७. अ.शा.पत्र ग्राम विकास व जल संधारण विभाग, क्र.ग्रापापु-१०९५/सीआर-१०१०/३९-अ, दि.४ मे, १९९५
८. शासन पत्र, महसुल व वन विभाग, क्र.एससीवाय-१०९४/सीआर-३०४/म-७, दिनांक २० मे, १९९५
९. शासन पत्र, ग्राम विकास व जल संधारण विभाग क्र.ग्रापापु-१०९५/सीआर-१०१०/३९-अ, दिनांक १५ जून, १९९५
१०. शासन निर्णय ग्राम विकास व जल संधारण विभाग क्र.एफआरजी १०९५/१६२६/सीआर-२८३१/२४, दिनांक ३१ ऑक्टोबर, १९९५
११. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१०९५/सीआर १०८४/पापु ०७, दिनांक ३/६/९६
१२. अ.शा.पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०९५/प्र.क्र.१०१०/पापु-०७, दिनांक ३० सप्टेंबर, १९९६
१३. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०९६/प्र.क्र.१२८०/पापु-०७, दिनांक २८/११/१९९६

**शासन निर्णय :-**

संदर्भात नमुद केलेले विषयाधीन आदेश अधिक्रमित करुन शासन याविषयाबाबत खालील प्रमाणे एकत्रित आदेश निर्गमित करीत आहे :-

१. सन १९८० व १९८५ च्या सर्वेक्षणातील "न हाताळलेल्या" गावांना/वाडयांना तसेच राजीव गांधी पेयजल अभियानांतर्गत झालेल्या सर्वेक्षणातील "सार्वजनिक उद्‌भव नसलेल्या" गावे/वाडयांमधील ग्रामीण

पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यासाठी सर्वोच्च अग्रकम देण्यात आला आहे. सहाजिकच दुर्गम आदिवासी भागातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची सोय नसलेली गावे/वाडया हयादेखील सर्वोच्च अग्रकम असणा-या संवर्गातच मोडतील. सबब, यापुढे किमान गरजा कार्यक्रमाखालील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील आदिवासी उपयोजना क्षेत्रांसाठी करण्यात आलेली तरतूद तसेच केंद्र पुरस्कृत अनुसूचित जाती/जमातीच्या वसाहतीत/क्षेत्रातील पाणी पुरवठयाच्या कार्यक्रमांतर्गत जिल्हयास उपलब्ध असलेली तरतूद सर्वोच्च अग्रक्रमाने सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची सोय नसलेल्या दुर्गम अदिवासी गावांत/वाडयांत वर स्पष्ट केल्यानुसार पाणी पुरवठा योजना घेण्यासाठी वापरण्यात यावी.

आदिवासी उपयोजना क्षेत्रात उन्हाळयात सपाट भागात १ कि.मी.पेक्षा जास्त अंतरावरुन अथवा डोंगराळ भागात १/२ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावरुन ग्रामस्थांना पाणी आणावे लागत असल्यास अशा गावांकरिता/वस्त्यांकरिता संबंधित गावे/वस्त्या समस्याप्रधान गावांच्या यादीत नसली तरी ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाणी पुरवठयाच्या उपाययोजना प्रचलित निकषाच्या अधीन राहून घेण्यात याव्यात आणि ज्या नळ योजना विहित निकषात बसत नसतील अशा दुर्गम आदिवासी भागातील योजनांच्या बाबतीत आवश्यकता भासल्यास असे निकष आदिवासी विकास विभागाने शिथील करुन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या सल्ल्याने योजना राबवावयाच्या आहेत. हा कार्यक्रम आदिवासी उपयोजना कार्यक्रमातही मंजूर करण्यात आलेल्या नियतव्ययाच्या मर्यादेत आदिवासी विकास विभागाने घोषित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गावात/वस्त्यात घेण्यात यावा.

२. सार्वजनिक पाणी पुरवठा व्यवस्था नसलेल्या दुर्गम/डोंगराळ आदिवासी गावात/वस्त्यात अग्रक्रमाने शुध्द पाणी पुरवठा करण्याच्या गरजेकडे लक्ष केंद्रीत करुन सदर कामाच नियोजन करुन अशा गावांची तालुकानिहाय यादी करावी व संबंधित जिल्हा भूवैज्ञानिकाच्या सल्ल्यानुसार पुढीलपैकी एका योग्य उपाययोजनेची निश्चिती करण्यात यावी.

१. विंधन विहीर
२. साधी विहीर किंवा पक्या शेवडया
३. जवळपासच्या अस्तित्वात असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेचे संबंधित गाव/वस्तीसाठी विस्तारीकरण

३. दि.१५.१.१९९३ रोजी केंद्र शासनाच्या तत्कालीन आदिवासी विकास मंत्र्यांनी सर्व राज्यातील आदिवासी कल्याण मंत्र्यासमवेतच्या परिषदेत केलेल्या शिफारशी नुसार प्रत्येक जिल्हयातील आदिवासी गाव व वस्त्यामध्ये किमान एकतरी सुरक्षीत व पिण्यायोग्य पाण्याचा उद्‌भव विकसित करण्यासाठी कार्यवाही करावी.

४. वर स्पष्ट केल्याप्रमाणे दुर्गम/डोंगराळ भागातील व अन्य आदिवासी भागात/वस्त्यांवर शुध्द पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांसाठी खाली नमुद केलेल्या विविध कार्यक्रमाखालील तरतुदीतून खर्च भागविण्यात यावा.

१. किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी करण्यात आलेली तरतूद.
२. केंद्र पुरस्कृत अनुसूचित जाती/जमातीच्या वसाहतीत पाणी पुरवठयासाठी केलेली तरतूद.
३. स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्रत्येक मतदार संघातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी राखून ठेवलेली २० टक्के तरतूद.
४. डोंगरी भागात विकासासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत शाळा बांधकामासाठी राखून ठेवलेली तरतूद वगळून उर्वरित निधी.

५. दशलक्ष विहीरी कार्यक्रमांतर्गत जिवनधारा विहिरींसाठी आवश्यक निधी राखून ठेवल्यानंतर उर्वरित निधी.
६. जवाहर रोजगार योजनांतर्गत निधी
७. वन अनुदान
८. मागास वर्गियांच्या कल्याणासाठी वापरावयाचा जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या उत्पन्नाचा १५ टक्के निधी.

४. दुर्गम भागातील कातकरी व आदिवासी वस्त्यांना जेथे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो तेथे पाणी साठविण्यासाठी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडून अथवा प्रचलित नियमानुसार निविदा पध्दत किंवा दरपत्रके मागावून अन्य पुरवठादार कंपन्यांकडून सिंटेक्स टाक्या खरेदी करुन उक्त वस्त्यांमध्ये निश्चितपणे पुरवाव्यात.

५. आदिवासी क्षेत्रातील कुपोषण व साथरोगांचे नियंत्रण करण्यासाठी त्यांच्या वस्त्यांमध्ये पिण्याचे पाणी शुध्द स्वरुपात मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक संस्थेची आहे. साथ रोगांना आळा बसावा व पिण्याच्या पाण्याचे शुध्दीकरण करुन सदर कार्यवाही अधिक निर्दोष परिणामकारक व नियोजनबद्व व्हावी यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

## १) **शुध्द पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने आवश्यक पूर्व नियोजन**

योजना दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे जर पावसाळयापुर्वी पार पाडण्यात आली तर त्याचा लाभ पाणी शुध्दीकरणासाठी होतो. परंतू जर योग्य पूर्वतयारी झाली नाही तर अनेक वेळा कार्यवाही करुनही त्याचा विशेष लाभ होत नाही. योजनांची दुरस्ती व देखभाल वेळीच व्हावी यासाठी जिल्हयातील सर्व पुर्ण व कार्यान्वित योजनांचे सर्वेक्षण करण्यात यावे. जिल्हयातील सर्व योजनांचे सर्वेक्षण दरवर्षी ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत करण्यात यावे. सदर सर्वेक्षणात फक्त तांत्रिक/स्थापत्य विषयक बाबींकडेच लक्ष न देता संबंधित गावात/वाडयात परिसर स्वच्छतेची परिस्थिती कशी आहे तसेच तेथे पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक औषधी द्रव्ये उपलब्ध आहेत किंवा कसे याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. यादृष्टीने संबंधित गाव/वाडयास न चुकता भेट द्यावी. ज्या गावात/वाडयात योजनांच्या बांधकामात बिघाड झाल्यामुळे किंवा तेथे पाणी शुध्दीकरण व्यवस्थितपणे होत नसल्यामुळे किंवा योजनेच्या जवळपास परिसर अस्वच्छ असल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे पाणीपुरवठा सुरक्षित नसेल अशा गावांविषयी/वाडयांविषयी संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिका-यांनी **प्रपत्र ब** मध्ये **क्रमांक-१** लाल रंगाचे प्रमाणपत्र (लाल कार्ड) देणे आवश्यक राहील. तसेच ज्या गावातील/वाडयातील योजनाचे पाणी पिण्याचे दृष्टीने सुरक्षीत असेल त्या गावाविषयी/वाडयाविषयी संबंधित वैद्यकीय अधिका-यांनी हिरव्या रंगाचे प्रमाणपत्र **प्रपत्र अ** मध्ये **क्रमांक १** (हिरवे कार्ड) द्यावे. अशा प्रकारे सर्वेक्षण दरवर्षी माहे ऑक्टोबर-जानेवारी या कालावधीत पूर्ण झाल्यानंतर जो एकत्रित अहवाल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राप्त होईल त्या आधारे पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. जिल्हा पाणी पुरवठा समितीची कार्यकारी समिती यांनी सदर सर्वेक्षणात आढळून आलेल्या योजनांच्या त्रुटींचा आढावा विनाविलंब घेवून ज्या गावासांठी/वाडयांसाठी लाल रंगाचे प्रमाणपत्र प्राप्त झाले असतील अशा ठिकाणी पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती पाण्याचे प्रदुषण थांबविण्याच्या व शुध्द पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने करणे आवश्यक असल्यास अशा योजनांच्या दुरुस्तीबाबतचा कालबध्द कृति आराखडा आखून सदर कृति आराखडयास जिल्हा पाणी पुरवठा समितीची मान्यता घ्यावी. पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती वेळीच होते किंवा नाही हे पाहण्याची व त्यानुसार कार्यवाही करुन घेण्याची

जबाबदारी जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी पुरवठा समिती यांची तर जिल्हा परिषद स्तरावर जलसंधारण व पिण्याचे पाणीपुरवठा समितीची राहिल. वैयक्तिकरित्या या कामास जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील योजनांच्या संदर्भात कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे जबाबदार राहतील. लाल रंगाचे प्रमाणपत्र मिळालेल्या गावातील/वाडयातील सर्व पाणी पुरवठा योजनांची दुरुस्ती मे महिना अखेर पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

२. ज्या गावात/वाडयात परिसर अस्वच्छ असल्यामुळे किंवा पाणी शुध्दीकरणासाठी पुरेशा प्रमाणात औषधी द्रव्ये नसल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे पाणीपुरवठा सुरक्षित नाही व संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिका-यांनी जेथे लाल रंगाचे प्रमाणपत्र **"प्रपत्र ब"** दिले आहे तेथे आवश्यक ती सुधारणात्मक कार्यवाही पावसाळयापूर्वी केली जाईल असे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कटाक्षाने पहाण्याचे आहे.

३. पावसाळा सुरु होण्यापुर्वी मे महिन्याच्या अखेर किंवा जून महिन्याच्या सुरुवातीस पूर्वी लाल रंगाचे प्रमाणपत्र मिळालेल्या प्रत्येक गावास/वाडयास संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिका-यांनी परत भेट देवून तेथे पाणीपुरवठा सुरक्षित व्हावा यादृष्टीने आवश्यक ती सुधारणात्मक कार्यवाही करण्यात आली आहे/किंवा कसे हे स्वतः पाहून पुढील पावसाळयात तेथे पाणीपुरवठा सुरक्षित/असुरक्षित असल्यास हिरव्या रंगाचे/लाल रंगाचे प्रमाणपत्र विहित प्रपत्रात **(प्रपत्र "अ" किंवा "ब" मध्ये क्रमांक २ टाकून)** द्यावे. वरील प्रमाणे फेर सर्वेक्षणामध्ये लाल रंगाचे प्रमाणपत्र मिळालेल्या गावात/वाडयात दूषित पाणी पुरवठयामुळे साथ रोगाचा उद्रेक झाल्यास अपेक्षित दुरुस्त्या, सुधारणा न होणे इत्यादि संबंधित यंत्रणेतील दोष आपोआप स्पष्ट होतील व सदर साथ उद्रेकासाठी संबंधित यंत्रणेस जबाबदार धरण्यात येईल. उदा.टी.सी.एल.पावडर वा इतर तत्सम औषधी द्रव्याची उपलब्धतता न झाल्यामुळे अशुध्द पाणी पुरवठा आल्यास यासंबंधात संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक व संबंधित गटाचे गट विकास अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) हे जबाबदारअसतील. योजनेतील बांधकामाच्या दुरुस्त्या वेळीच करण्यात न आल्यामुळे अशुध्द पाणीपुरवठा झाल्यास त्यास संबंधित ग्रामपंचायत व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणपुरवठा विभाग जिल्हा परिषद/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे वैयक्तिकरित्या जबाबदार राहतील. परिसर स्वच्छतेअभावी अशुध्द पाणीपुरवठा झाल्यास त्यास संबंधित ग्रामपंचायतीस जबाबदार धरले जाईल.

(२) **टी.सी.एल.पावडर किंवा तत्सम औषधी द्रव्ये खरेदी करण्यासाठी करावयाचे नियोजन**

पाणीपुरवठा योजनेतून शुध्द पाणी मिळण्यासाठी पाणी शुध्दीकरण प्रक्रिया नियमितपणे करण्यासाठी टी.सी.एल.पावडर वा तत्सम औषधी द्रव्ये पुरेशा प्रमाणात उपलब्ध असणे, पाणी शुध्दीकरण प्रक्रियेचे नियमित संनियंत्रण करणे याबाबी महत्वाच्या आहे. यासाठी खालीलप्रमाणे उपयोजना करण्यात याव्यात.

(अ) टी.सी.एल.पावडर किंवा तत्सम औषधी द्रव्याची खरेदी ग्रामपंचायतींनी शक्यतो ग्रामपंचायत स्तरावर करावी. संपुर्ण आर्थिक वर्षात ग्राम पंचायतीस किती पावडरची आवश्यकता भासेल व त्यासाठी किती निधी लागणार आहे. याचा अंदाज घ्यावा. यासाठी सोबतच्या **प्रपत्र "क"** मध्ये नमूद केल्यानुसार ग्राम पंचायतींची वार्षिक गरज काढण्यात यावी व त्यानुसार अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी. ग्राम पंचायतींकडे यासाठी पुरेशा निधी उपलब्ध नसल्यास संबंधित ग्राम पंचायतीने यासाठी अतिरिक्त निधी मिळण्याबाबत प्रस्ताव **प्रपत्र "ड"** गट विकास अधिका-यांकडे पाठवावा असे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित गट विकास अधिका-यांनी संबंधित ग्राम पंचायतीकडे पुरेसा निधी पाणी शुध्दीकरणासाठी/औषधी द्रव्ये विकत घेण्याकरीता उपलब्ध नाही याची खात्री करावी व याकरिता किती निधी आवश्यक आहे व पंचायत समिती स्तरावर किती निधी उपलब्ध करुन देता येईल याचा आढावा घ्यावा. याउपरही आणखी निधीची गरज असल्यास उर्वरीत निधीच्या मागणीसाठी प्रस्ताव **प्रपत्र "इ"** मध्ये जिल्हा परिषदेकडे

पाठवावा. वर नमूद केल्याप्रमाणे ग्राम पंचायत/पंचायत समितीकडून टी.सी.एल.पावडर व तत्सम औषधी द्रव्याच्या खरेदीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी प्राप्त झाल्यानंतर संबंधित जिल्हा परिषदेने टी.सी.एल पावडरची खरेदी खालील प्रमाणे करावी व याबाबतच्या निधीची वसूली संबंधित जिल्हा परिषदेने ग्राम पंचायत/पंचायत समितीकडून त्यांना देण्यात येणा-या अनुदानातून करावी.

i) संबंधित जिल्हा परिषदेने यासाठी सर्व प्रथम त्यांच्या स्वत:च्या उत्पन्नाच्या अंदाजपत्रकात "८ सार्वजनिक आरोग्य " या लेखाशीर्षाखाली केलेली तरतूद वापरावी.

ii) जिल्हायातील जी गावे/वाडया वन क्षेत्रात येतात अशी गावे/वाडयासाठी औषधी द्रव्याची खरेदी वन अनुदानातून करण्यात यावी.

iii) वरील प्रमाणे खर्च झाल्यानंतरही निधी अपूरा पडत असल्यास जिल्हा स्तरावर आस्थापित करण्यात आलेल्या देखभाल व दुरुस्ती निधीमधून औषधी द्रव्याची खरेदी करण्यात यावी.

iv) टी.सी.एल.पावडर व तत्सम औषधी द्रव्याची खरेदी करण्यासाठी जिल्हा परिषदेने लोक वर्गणी उभी करावी.

(ब) वर नमुद केल्याप्रमाणे टी.सी.एल.पावडर किंवा तत्सम औषधी द्रव्ये उपलब्धतेसाठी करावयाचे नियोजन दर वर्षी पुढील वर्षाचे अंदाजपत्रक अंतिम होण्यापुर्वीच करण्यात यावे व त्यानुसार अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतूद करण्यात यावी.

(क) जिल्हा परिषद स्तरावर टी.सी.एल पावडर किंवा तत्सम औषधी द्रव्ये खरेदी करण्याच्या संदर्भात संबंधित विषय समिती म्हणून अधिकार आरोग्य समितीस राहतील. खरेदीची किंमत, विषय समितीच्या अधिकार-कक्षेपेक्षा जास्त असल्यास प्रचलित सर्व सामान्य अधिकार मर्यादेनुसार स्थायी समिती किंवा यथायोग्य जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने या बाबतीत कार्यवाही करावयाची आहे.

(ड) वरील परिच्छेदात नमुद केल्यानुसार ग्रामपंचायत/पंचायत समिती वा जिल्हा परिषद या तिन्ही स्तरावर टी.सी.एल.पावडर किंवा तत्सम औषधी द्रव्ये खरेदीसाठी नियोजन करण्यात येईल यांचे संनियंत्रण जिल्हा परिषद स्तरावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) यांना करावयाचे असून गट स्तरावर ही जबाबदारी संबंधित गट विकास अधिकारी याची राहील. वरील दोन्ही अधिका-यांनी खरेदी केलेल्या टी.सी.एल.पावडरचे वाटप व विनियोग योग्य त-हेने सर्व स्तरावर होईल हे कटाक्षाने पहावे. सदर प्रकरणी आवश्यकतेनुसार तांत्रिक सहकार्य जिल्हा परिषद स्तरावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी तर पंचायत समिती स्तरावर वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी करावे.

(३) **पाणी शुध्दीकरण करण्यासाठी मनुष्यबळ उभारणे :-**

पाणी शुध्दीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यासाठी ग्राम स्तरावर उपलब्ध असलेल्या आरोग्य रक्षक, आंगणवाडी कार्यकर्ती, ग्राम पंचायत परिचर, शिक्षक अथवा मानधनावर स्वयंस्पूर्तीने कामे करणा-या स्वंयसेवकाची निवड करुन त्याच्यावर दैनंदिन पाणी शुध्दीकरण करण्याची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. पाणी शुध्दीकरण करणे हे साथ प्रतिबंध व नियंत्रणाचे मुख्यसुत्र आहे. याकरीता गाव व गट पातळीवर पाणी शुध्दीकरण करण्याची कार्यवाही टप्पानिहाय योग्य पध्दतीने होते किंवा नाही. तसेच शुध्दीकरण करण्याची जबाबदारी ज्या व्यक्तीवर सोपविण्यात आली आहे त्या व्यक्ती सदर काम योग्यरित्या करतात किंवा नाही यांचे संनियंत्रण करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी सोबतचे **प्रपत्र फ** मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे नोंदवही ठेवण्यात यावी. तसेच टी.सी.एल.साठी व गुणवत्ता नियंत्रण व टी.सी.एल.पावडर दैनंदिन वापर यांच्या नोंदी सोबतच्या **प्रपत्र ग** मधील तक्ता क्रमांक (१) व (२) मध्ये ठेवण्यात यावी. तर पाणी नमुना तपासणीचा अहवाल **प्रपत्र य** मध्ये दिलेल्या नमुन्यात ठेवण्यात यावा.

पाणी शुध्दीकरण हे योग्य व शास्त्रशुध्द पध्दतीने व्हावे. याकरता पाणी शुध्दीकरणासाठी जबाबदारअसलेल्या कर्मचा-यांना दर वर्षी प्रशिक्षण देण्याची जबाबदारी जिल्हा स्तरावर जिल्हा आरोग्य अधिका-यांची असेल तर पंचायत समिती स्तरावर सदर जबाबदारी संबंधीत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिका-यांची राहील.

पाणी शुध्दीकरणासाठी वापरण्यात येत असलेल्या टी.सी.एल.पावडरचा दर्जा/प्रत पडताळणीसाठी प्रत्येक गावात एक क्लोरोमीटर देण्यात यावे.

६. समाजातील दुर्बल घटकातील आदिवासींच्या आरोग्यात सुधारणा करणे, तसेच त्यांना पोषण, पिण्याचे शुध्द पाणी, आरोग्य सेवा इत्यादि उपलब्ध करुन त्यांच्या क्रियाशील आयुष्याची कालमर्यादा वाढविण्यासाठी सर्व घटक कार्यक्रम एकत्रित करुन एक विशेष कृती कार्यक्रम नवसंजीवन योजना राबविण्याबाबत आदिवासी विभागाने दि.२२.६.१९९५ च्या निर्णय क्रमांक टीएसपी-१०९५/प्र.क्र.६/ कार्यासन-६, अन्वये सविस्तर आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सर्व गावात व वाडयात जनतेला पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने पाणी पुरवठा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्याबाबत खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात.

१) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गावांना व वाडयांना पिण्याचे शुध्द पाणी पुरविण्याच्या कामास सर्वाधिक प्राधान्य देण्यात यावे.

२) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ज्या गावे वा वाडयात पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात योजना कार्यान्वित झालेल्या नसतील अशा गावांना व वाडयांना पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत तातडीने योजना घ्याव्यात.

३) वरील क्र.२ मध्ये नमूद केलेली गावे व वाडया संबंधित जिल्हयाच्या बृहत आराखडयात समाविष्ट करण्यात आल्याची खात्री करुन घेण्यात यावी.

४) वरील क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे योजनेच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक तयार करुन ते संबंधित अधिका-यांनी आपल्या कार्यालयातील भिंतीवर लावावे व त्या वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही होईल याबाबत काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

५) सर्व नादुरुस्त योजनांची व विंधण विहिरीची दुरुस्ती पावसाळा संपताच करावी व त्यापुढे योजना नादुरुस्त झाल्यानंतर तीन दिवसांच्या आत व विहिरी नादुरुस्त झाल्यानंतर दोन दिवसांच्या आत दुरुस्त होईल अशी व्यवस्था करावी.

६) प्रत्येक गावातील ग्राम पंचायतीच्या कर्मचा-यांना (ग्राम सेवक/अंगणवाडी कार्यकर्ती) किंवा रोजंदारीवर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना पिण्याचे पाणी शुध्द करण्याच्या संदर्भात आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

७) पाणी शुध्द करण्यासाठी लागणा-या टी.सी.एल.पावडरच्या खरेदीबाबत व ती स्थानिक संस्थांना उपलब्ध करुन देण्याबाबत गट विकास अधिका-याने प्रत्येक आठवडयात व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-याने महिन्यातून एकदा आढावा घ्यावा, जेणे करुन टी.सी.एल.पावडरचा साठा नेहमी प्रत्येक गावात व वाडयात उपलब्ध असतो याची खात्री करुन घेता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(रु. न. देशमुख)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) विभागीय आयुक्त, (सर्व)
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई
५) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
६) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
७) विभागीय उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
८) अधीक्षक अभियंता तथा जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
९) सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१०) कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
११) कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१२) उप अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१३) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता)
१४) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१५) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१६) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१७) उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
१८) वित्त विभाग (व्यय-३, अर्थसंकल्प-१६)
१९) ग्राम विकास व जल संधारण विभाग/ आदिवासी विकास विभाग/सार्वजनिक आरोग्य विभाग
२०) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन अधिकारी
२१) निवडनस्ती (पापु-०७), पा.पु.व स्व.वि.

**प्रपत्र - अ** (हिरव्या रंगाचे प्रमाणपत्र)

(वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी सुरक्षित पिण्याच्या पाण्याबाबत द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना.

**प्र मा ण पत्र** (क्रमांक १/२)

जिल्हा : तालुका :
गाव/वाडी : जनगणना क्र.

श्री.------------------------------------------------ वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र---- --------------------- तालुका ----------------------- जिल्हा ------------------- प्रमाणित करतो की, गावातील/वाडयातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत सुरक्षीत असून ते सुरक्षित ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे पुर्वतयारी/कार्यवाही करण्यात आली आहे.

१. पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक असलेल्या साधनसामुग्रीचा (टिसीएल पावडर, द्रव क्लोरीन, क्लोरीन गोळया, इत्यादी) पुरवठा ग्राम पंचायतीकडे उपलब्ध आहे.

२. पाणी शुध्दीकरण सामुग्रीचा साठा प्रमाणित असल्याची पडताळणी ग्राम पंचायतीने केली आहे.

३. पाणी शुध्दीकरणाची कार्यवाही करण्यासाठी जबाबदार कर्मचा-यां/व्यक्तींची निवड/नियुक्ती ग्राम पंचायतीने केली आहे.

४. नळ पाणी पुरवठा योजनेच्या ---------------------------- ठिकाणी पाणी शुध्दीकरणाची उचित व्यवस्था करण्यात आली आहे. नळांमधील गळत्यांची दुरुस्ती करण्यात आली आहे.

५. विहिरींच्या कठडयांची व परिसराची आवश्यक तेथे दुरुस्ती करण्यात आली आहे.

६. हातपंप, बोअरवेल इत्यादी पाणी पुरवठयाची साधने व परिसर सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था सक्षम यंत्रणेने केली आहे.

७. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत असुरक्षितच राहणार आहेत. अशा ठिकाणी ते स्त्रोत पिण्याच्या पाण्यासाठी असुरक्षित असल्याचे फलक लावण्यात आले आहेत.

X ८. अन्य महत्वाची बाब

वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र

X वैद्यकीय अधिका-यांच्या मते महत्वाचा असणारा इतर कोणताही तपशील, उदा.पाण्याचे नमुने.

टिप :- सदर प्रमाणपत्र क्रमांक १ चे स्वरुपात ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत सर्व्हेक्षणाचे आधारे तर २ चे स्वरुपात मे, जून महिन्यात फेर सर्व्हेक्षणाअंती द्यावयाचे आहे.

<u>**प्रपत्र-ब**</u>

(लाल रंगाचे प्रमाणपत्र)

(वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी असुरक्षित पाणी पुरवठयाबाबत द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना)

**प्र मा ण प त्र** (क्रमांक १/२)

जिल्हा : तालुका

गाव/वाडी : जनगणना क्र.

श्री.---------------------------------------------------- वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र ---------------------- तालुका--------------------- जिल्हा --------------------- प्रमाणित करतो की, --------------------------- या गावातील/वाडयातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत सुरक्षित नाहीत. हे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक असलेली व खाली नमूद करण्यात आलेली पूर्वतयारी/कार्यवाही करण्यात आलेली नाही.

१. पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक असलेल्या साधनसामुग्रीचा (टीसीएल पावडर, द्रव क्लोरीन गोळया, इत्यादी) पुरवठा ग्राम पंचायतीकडे उपलब्ध नाही.

२. पाणी शुध्दीकरण सामुग्रीचा उपलब्ध साठा प्रमाणित असल्याची पडताळणी ग्राम पंचायतीने केलेली नाही.

३. पाणी शुध्दीकरणाची कार्यवाही करण्यासठी जबाबदार कर्मचा-यांची/व्यक्तींची निवड/नियुक्ती ग्राम पंचायतीने केलेली नाही.

४. नळ पाणी योजनेच्या ------------------------------------- ठिकाणी पाणी शुध्दीकरणाची उचित व्यवस्था करण्यात आलेली नाही. नळातील गळत्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नाही.

५. सोबत जोडलेल्या यादीनुसार विहिरींच्या कठडयांची व परिसराची आवश्यक दुरुस्ती सक्षम यंत्रणेने केलेली नाही.

६. हातपंप, बोअरवेल, इ.पाणी पुरवठयाची साधने व परिसर सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था, सक्षम यंत्रणेने केलेली नाही.

७. ज्या पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत असुरक्षितच राहणार आहेत. अशा ठिकाणी ते स्त्रोत पिण्याच्या पाण्यासाठी असुरक्षित असल्याचे फलक लावण्यात आलेले नाहीत.

X ८. अन्य महत्वाची बाब

वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र

X वैद्यकीय अधिका-यांच्या मते महत्वाचा असणारा इतर कोणताही तपशील उदा.पाण्याचे नमुने

टिप :- सदर प्रमाणपत्र क्रमांक १ चे स्वरुपात ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत सर्वेक्षणाचे आधारे तर क्रमांक २ चे स्वरुपात मे/जून महिन्यात फेर सर्वेक्षणाअंती द्यावयाचे आहे.

## प्रपत्र "क"

पाणी पुरवठा साठयाचे शुध्दीकरणासाठी लागणा-या टी.सी.एल.ची गरज

| अ.क्र. | पाणी साठा प्रकार | टी.सी.एल.ची गरज | |
|---|---|---|---|
| १. | विंधन विहिर | प्रत्येक विंधन विहिरीस ३०० ग्रॅम | सहा महिन्यातून एक वेळ |
| २. | सार्वजनिक विहिर | १००० लिटर पाण्यात ५ ग्रॅमप्रामणे | दैनंदिन पाणीसाठा लिटरमध्ये x ५ ग्रॅम = ——— १००० एका विहिरीसाठी दैनंदिन |
| ३. | नळ पाणी पुरवठा | टाकीची क्षमता | ----"--- ग्रॅम एका वेळेस शुध्दीकरणासाठी |

वरील सुत्राचा वापर करुन एकूण विहिरींच्या/पाणी साठयांच्या संख्येनुसार मासिक/वार्षिक गरज काढण्यात यावी.

## प्रपत्र -ड-

जिल्हा :-

पंचायत समिती :-

| अ.क्र. | ग्राम पंचायतीचे नाव | संपुर्ण आर्थिक वर्षात किती टी.सी.एल.पावडरची गरज आहे. | स्तंभ क्र.३ प्रमाणे टी.सी.एल. पावडर खरेदीवरील अंदाजित खर्च | स्तंभ क्र.४ मधील खर्च भागविण्यासाठी ग्राम पंचायत किती कमाल तरतूद करु शकेल. | टी.सी.एल.पावडर खरेदीसाठी उर्वरित आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

## प्रपत्र -इ-

| अ.क्र. | पंचायत समिती कार्यक्षेत्रातील एकूण ग्राम पंचायतींची संख्या | या सर्व ग्रा.पं.ची संपूर्ण आर्थिक वर्षात आवश्यक टी.सी.एल. पावडरचे प्रमाण व अंदाजित किंमत | | पंचायत समिती क्षेत्रातील सर्व ग्रा.प.कडून सदर टी.सी.एल.पावडरसाठी उपलब्ध होणारा निधी | पं.स.स्तरावर पंचायत समितीच्या अंदाजपत्रकीय तरतुदीतून सदर टी.सी.एल. पावडरसाठी उपलब्ध होणार निधी | याप्रमाणे टी.सी.एल पावडर खरेदी करण्यासाठी जि.प.स्तरावर अपेक्षित निधी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रमाण | किंमत | | | |
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ |

## प्रपत्र -फ-

### पाणी पुरवठा - पाणी शुध्दीकरण नोंदवही

गावाचे नाव :-

जोखीमग्रस्त आहे/नाही

लोकसंख्या :-

पाणी शुध्दीकरण करणा-या कर्मचा-याचे नाव :-

सरपंचाचे नाव :-

ग्रासेवकाचे नाव :-

प्रशिक्षणाचा दिनांक :-

---

नोंद वहीत खालील तक्त्यामध्ये माहिती ठेवावी

**तक्ता क्र.१**

**गावातील पाणी पुरवठा साधनांची माहिती**

| अ.क्र. | पाणी पुरवठा सोयीचा प्रकार (स्थानिक नावानुसार) | संख्या एकूण | संख्या वापरात | संख्या बंद |
|---|---|---|---|---|
| १. | विंधन विहिरी | | | |
| २. | हातपंप | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | सार्वजनिक विहिरी | मोजमापे (मिटरमध्ये) (विहिरीचा व्यास) | पाण्याची खोली |
| | १) | | |
| | २) | | |
| | ३) | | |
| | ४) | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. नळपाणी पुरवठा योजना | टाकीची (   ) क्षमता (लिटर्स) | व्हॉल्व संख्या | स्टँड पोस्ट संख्या | घरगुती नळ कनेक्शन संख्या |

५. नियमित पाणी पुरवठा साधने काही कारणाने बंद असल्यास,

६. पर्यायी पाणी पुरवठयाच्या सोयी (विहिरी, ओढे, टँकर, इ. चा उल्लेख करावा)
१)
२)
३)

## प्रपत्र "ग"

### तक्ता क्र.१

### टी.सी.एल.साठा व गुणवत्ता नियंत्रण

| अ.क्र. | पुरवठा करणा-याचे नांव (पं.स./जि.प.) | दिनांक | पुरवठा कि.ग्रॅ. | उत्पादकाचे नाव उत्पादनाची तारीख बॅच क्र. क्लोरीनचे प्रमाण | नमुना प्रयोग शाळेत पाठविण्याची तारीख | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|

कार्यवाही

### तक्ता क्र.२

### टी.सी.एल.साठा दैनंदिन वापर नोंद

| अ.क्र. | तारीख | पाणी साठा प्रकार | एकूण पाणी (लिटर) | वापरलेली टि.सी.एल. | शिल्लक साठा | ओ.टी. टेस्ट | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|

## प्रपत्र "य"

### पाणी नमुने तपासणी अहवाल

| अ.क्र. | पाणी साठा प्रकार | पाणी नमुना घेतल्याची तारीख | अहवाल प्राप्त झाल्याची तारीख व निष्कर्ष | कार्यवाही |
|---|---|---|---|---|

* आठवडयातून एक पाणी नमुना प्रत्येक पाणी साठा उद्‌भवातून पाठवावा.

साथीची माहिती देणे ग्राम पंचायतीचे वैद्यानिक कर्तव्य आहे.

-----------------------------------------------------

(हे पत्र वैद्यकीय अधिका-यास समक्ष द्यावे व पोहोच घ्यावी.)

प्रति,

वैद्यकीय अधिकारी,
प्रा.आ.केंद्र -------------------------------

मौजे-------------------------------- येथे तारीख -------------------------------

पासून उलटी-जुलाब/ताप/काविळ साथ सुरु झाली असून एकूण--------------------------------- लागण

------------------ मृत्यू झाले आहेत. ताबडतोब औषधोपचाराची सोय करावी.

आपला,

दिनांक :-

सरपंच/ग्रामसेवक

-----------------------------------------------------------------------------------------------

१) विनाविलंब साथीची माहिती देण्यामुळे सत्वर औषधोपचार करुन मृत्यू टाळता येतात.

२) त्रास होता उलटी/जुलाबाचा,
करा उपचार क्षार संजीवनीचा

३) शुध्द पाणी हेचं जीवन,
यास्तव करा त्याचे सेवन

४) जेवणापूर्वी धुवा हात,
जेवणानंतर धुवा दात

प्रति,
-------------------------------------
-------------------------------------
-------------------------------------
-------------------------------------